'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' प्रस्तुत ई- षटमासिक

# युवक

अंक पहिला | फेब्रुवारी २०२०

## संत ई- विशेषांक



संपादक

आशुतोष सुनिल राहाणे पाटील.




असाध्य ते साध्य करिती सायास | कारण अभ्यास तुका म्हणे ||

‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ प्रस्तुत ई- षटमासिक

# युवक

अंक पहिला | फेब्रुवारी २०२०

## संत ई- विशेषांक

**संपादक**

**आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**

सहकार्य- सर्व कार्यकारणी व सदस्य शिवस्फूर्ती वाचन कट्टा, औरंगाबाद.

अक्षरजुळवणी, मुखपृष्ठ व आतील सजावट- आशुतोष सुनिल राहाणे पाटील.

शिवस्फूर्ती वाचन कट्टा संचलित षटमासिक ‘युवक’ चा फुब्रुवारी २०२० चा ‘संत विशेषांक’ हा फक्त ‘ई- अंक’ प्रकाशित केलेला असुन तो वाचकांसाठी मोफत उपलब्ध केलेला आहे. ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ च्या संकेतस्थळावर हा अंक डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध असेल.
या अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय...

आज 19 फेब्रुवारी म्हणजेच शिवजयंती दिनी **'शिवस्फूर्ती वाचन कट्टा'** ही संकल्पना अमलात आणुन एक वर्ष पुर्ण झाले. वर्षपुर्तीच्या औचित्यावर **'युवक'** या ई- षटमासिकाचा पहीला अंक आपल्या हाती सोपवितांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. वर्षभरात 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' ने विविध उपक्रम हाती घेतले, कित्तेक विद्यार्थ्यांना वाचनाकडे, लिखाणाकडे वळवले आणि हेच या संकल्पनेचे यश आहे असे आम्हाला वाटते. 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' च्या 'ई- दिवाळी विशेषांक' ला वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला हजारो लोकांपर्यंत अंक पोहोचला कित्तेक अभिप्राय आम्हाला आले आणि यातुनच प्रेरणा घेउन आम्ही आपल्या समोर सादर करीत आहोत 'युवक' हे ई- षटमासिक.

'शिवस्फूर्ती वाचक कट्टा' शी जुळलेल्या तरुणांना लिहायला पहीली संधी मिळाली ती ई- दिवाळी विशेषांकात आणि त्या पहील्याच प्रयत्नात हे तरुण हजारो लोकांपर्यंत पोहोचले. नविन लेखक जेव्हा काही लिहीतात तेव्हा पहीला प्रश्न असतो की आपण लोकांपर्यंत कसे पोहोचणार ? आणि मी स्वतः एक तरुण लेखक म्हणुन मला वाटले की तरुणांना व्यासपीठ मिळत नसेल तर आपण ते उभे करुया आणि यातुनच 'युवक' ची संकल्पना पुढे आली. आता दर सहा महीन्याला आपल्या लिखाणासाठी आम्ही त्यांना हक्काचे व्यासपिठ उपलब्ध करुन देत आहोत आणि ते म्हणजे 'युवक' हे 'ई- षटमासिक'. 'युवक' या नावाचे श्रेय जाते ते श्री. शरद तांदळे यांना. शिवस्फूर्ती वाचन कट्टा तर्फे आयोजित एका कार्यक्रमात ते पाहुणे म्हणुन आले असता ई- षटमासिकासाठी 'युवक' हे नाव त्यांनी आम्हाला सुचवले, त्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक धन्यवाद.

'युवक' या ई- षटमासिकाचे 19 फेब्रुवारी आणि 15 ऑगस्ट असे वर्षात दोन अंक प्रसिद्ध होतील. प्रत्येक अंकाचा विषय वेगळा असेल. पहीला अंक आपल्या समोर सादर करतोय 'संत विशेषांक'.

महाराष्ट्र ही संत महात्म्यांची भुमी आहे. संतांच्या कार्यानी ही भुमी पावन झालेली आहे. आजचा महाराष्ट्र घडवण्यामागे संतांचे महत्व अनन्यसाधारण आहे. महाराष्ट्रात उभे राहीलेले लढे हे संतांच्या प्रेरणेनेच उभे राहीले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनाही आपल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात संत महात्म्यांचे सदैव पाठबळ राहीले आहे आणि म्हणुनच पहिला अंक आम्ही 'संत विशेषांक' करण्याचे ठरवले. महाराष्ट्रातील निवडक बारा संत घेउन त्यांच्या कार्याचा अगदी थोडक्यात आढावा मांडण्याच्या प्रयत्न तसेच लेखकांचे त्यावर मत मांडण्याचा प्रयत्न या अंकात केलेला आहे. **हा महाराष्ट्र घडविणाऱ्या सर्व हातांच्या चरणी आम्ही हा अंक विनम्रतापुर्वक अर्पण करित आहोत.** आपल्याला अंक आवडेल अशी आशा आहे.

वाचन कट्ट्यातील मुलांच्या लिखाणाला वाचक मिळावा आणि त्यांनी आणखी जोमानी लिहायला लागावं याच साठी हा 'युवक' चा अट्टाहास. युवक हे फक्त ई- षटमासिक असुन मोफत आपल्याला हे उपलब्ध करित आहोत. या ई- मासिकाचे सर्व अंक तसेच 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' चा दिवाळी अंक कायमस्वरुपी मोफत डाउनलोड करण्यासाठी 'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. 'युवक' चे लेखक फक्त १९ ते २२ वर्षामधील तरुण असुन अजुन लिखाणात नवे असल्याने काही दोष लिखाणात आढळु शकतात. विद्यार्थ्यांनी पाठवलेले लिखाण हे जसेच्या तसे प्रकाशित केलेले असुन त्यात बदल करण्यात आलेला नाही. विद्यार्थ्यांच्या चुका त्यांना कळाव्या आणि आपले लिखान लोकांना आवडते का ? या प्रश्नाचे उत्तर वाचकांनीच त्यांना द्यावं या हेतुने कुठलाही बदल केलेला नाही. तरी आपण सुजान वाचक आम्हा तरुणांच्या या प्रयत्नाला वाव देत काही चुका असतील तर त्यांना पोटात घ्याल ही माफक अपेक्षा. पुढील वेळी यात नक्कीच सुधार होइल असा मी शब्द देतो. व्याकरणातील दुरुस्त्या करण्यात आम्हाला सहकार्य केल्याबद्दल आम्ही डॉ. पुजा वागळे यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

आपण वाचक असाल आणि 'युवक' मधे लिहु इच्छित असाल तर आपले स्वागतच आहे, आपण आम्हाला संपर्क साधु शकता आम्ही आपल्या लिखाणाला प्रसिद्धी देउ.

तुकाराम महाराजांच्या विचाराने प्रेरित होउन अधिकाधिक विद्यार्थ्यांना वाटेवर आणण्याचा प्रयत्न आम्ही सदैव करत राहु. शेवटी सर्व तरुण मित्रांना एकच सांगणे **'असाध्य ते साध्य करिती सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥' म्हणुन अभ्यास करत राहा, वाचत राहा, लिहीत राहा.....**

छत्रपती शिवरायांना स्फूर्तीस्थान माननारे आम्ही तरुण आहोत. महाराजांचे गुण अंगिकारुन तसे वागणे हा आमचा उद्देश आहे. आमचे शिवराय आम्हाला नाचयला नाही तर अभ्यास करायला सांगतात म्हणुन **'छत्रपती शिवरायांची जयंती नाचुन नाही तर वाचुन साजरी करुया'**. महाराज आज असते तरी त्यांनी आपल्याला हाच सल्ला दिला असता...

**'शिवस्फूर्ती वाचन कट्टा' तर्फे आपणा सर्वांना शिवजयंतीच्या खुप खुप शुभेच्छा !**



**आपला नम्र**

**संपादक**

**आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**

# अंतरंग

- संत सावता माळी
  - प्रविण वैद्य
- संत गोरोबा महाराज
  - राजीव पवार
- संत नामदेव महाराज
  - अविनाश मगर
- संत ज्ञानेश्वर महाराज
  - संदेश डोळसे
- संत नरहरी सोनार
  - उमेश इंगळे
- संत चोखामेळा
  - प्रेम त्रिभुवन
- संत जनाबाई
  - राहुल धबडगे, सचिन पन्हाळकर
- संत एकनाथ महाराज
  - सुप्रिया जाधव
- संत तुकाराम महाराज
  - आशुतोष पाटील
- संत सेना महाराज
  - शैलेश राउत
- संत गाडगे महाराज
  - अजय त्रिभुवन
- संत तुकडोजी महाराज
  - गणेश गायके

# लेखकांचा परिचय....



**आशुतोष सुनिल राहाणे पाटील.**

नाणी संग्राहक, लेखक, इतिहास अभ्यासक असुन ‘पश्चिमी क्षत्रपांची नाणी’, ‘स्वराज्याचे चलन’ आणि ‘नाणी, संग्रह आणि संग्राहक’ या पुस्तकाचे लेखक आहे. ‘युवक’ या ई- षटमासिकाचे संपादक असुन ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ चे अध्यक्ष आहेत.

संपर्क- 8698825074/ 8669019748 | ई- मेल- Ashutoshp1010@gmail.com



**शैलेश. भा. राउत.**

शिक्षण M.sc. B.ed झालेले असुन विविध विषयांवर वाचन व कविता तसेच गजल लेखनाची आवड आहे. वाचनाची संस्कृती तरुणांमधे रुजवण्यासाठी या ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’ तर्फे प्रयत्नशील आहे.



**अजय त्रिभुवन.**

तरुण गजलकार असुन विविध विषयांवर वाचनांची आवड आहे.



**उमेश विष्णु इंगळे.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असुन विविध विचारवंतांचे साहित्य वाचनाची आवड आहे.



**संदेश हनुमंत डोळसे**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. चित्रपट हा आवडीचा व पुढे जाऊन आयुष्याचा एक भाग होणार असल्यामुळे या विषयावर लिखाण करण्याचा प्रयत्न करत आहे.



**प्रेमराज रावसाहेब त्रिभुवन.**

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA तृतीय वर्षाला शिक्षण घेत आहे. कविता, लघुकथा तसेच लघुचित्रपटांची पटकथा लिहितो.



**अविनाश मगर.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BSC द्वितीय वर्षाला शिक्षण घेत आहे. वाचन, फोटोग्राफी तसे फिरण्याची आवड आहे.



**सचिन राजेंद्र पन्हाळकर.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असुन विविध साहित्य वाचनाची आवड आहे.



**प्रविण वैद्य.**
यंत्र अभियंता, वाचन करण्याची आवड असून कविता लिहितो. विविध विषयांवर व्याख्यान करतो.



**राजीव मोतीराम पवार.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असुन नाटक आणि पुस्तके वाचण्याची आवड आहे.



**गणेश कारभारी गायके.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA द्वितीय वर्षाला शिक्षण घेत असुन विविध साहित्य वाचनाची आवड आहे.



**राहुल बालकिशन धबडगे.**
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे BA. प्रथम वर्षाला शिक्षण घेत असुन वैचारिक पुस्तके वाचनाची आवड.



**सुप्रिया सुभाष जाधव.**
संत साहित्य, इतिहास विषयावर वाचनांची आवड आहे.



### भक्तिभावाचा मळा फुलविणारे

# संत सावता माळी


आपले संत, त्यांचे विचार, त्या संतांनी लिहिलेले अभंग या सगळ्या गोष्टींचा विचार करता बऱ्याच तरुणांचा असा समज असतो की ह्या गोष्टी म्हणजे म्हातारपणात समजून घेण्याच्या असतात. तरी आताशा बऱ्याच अंशी सोशल मीडिया मुळे म्हणा की प्रबोधनकारांकडून म्हणा संतांचे विचार आपल्या पर्यंत पोहोचायला लागलेले आहेत आणि तरुण पिढीला सुद्धा ते पचायला लागले आहेत, ही सुद्धा एक महत्वपूर्ण बाब आहे. बाहेरच्या देशात असा विचारांचा मौलिक खजिना जो मोटिवेशनल सेमिनार मार्फत पैसे देऊन दिला जातो तो आमच्या या भारत भूमीत आम्हाला मोफत मिळाल्यामुळे कदाचित आम्हाला त्याचं महत्व समजलेलं नसेल. या गोष्टींचा विचार करता आपल्या शिवस्फूर्ती वाचन कट्ट्याकडून आपल्या षटमासिकासाठी हे विषय लिहिण्यासाठी मिळणं म्हणजे खरंच अभिमानास्पद बाब आहे.

आपल्या देशातील या संतांच्या पंगतीत एक महत्त्वाचं असणारे नाव म्हणजे 'संत सावता माळी'. खरी समस्या इथून सुरू होते की प्रत्येक संताच्या नावापुढे त्यांच्या जातीचं लेबल लावण्यात आल आणि पूर्ण विश्वासाठी त्या संतांनी दिलेला विचार तो फक्त त्या- त्या जातीतल्या लोकांनीच अभ्यासावा असं मिथक बनून गेलं. पण त्यांचे व्यापक विचार सगळ्यांपर्यंत पोहोचावेत हा या लिखाणाच्या मागचा हेतू. मुळात संत सावता महाराज यांचे अभंग खूप कमी प्रमाणात उपलब्ध आहेत आणि जे उपलब्ध आहेत ते

'काशीबा गुरव' नावाच्या व्यक्तीने लिहिलेले आहेत असं म्हटलं जातं. तेराव्या शतकात एवढ्या आधुनिक वृत्तीचे विचार जोपासणे हे खरच अद्‌भुत आहे. आपल्या कामातच आपला देव असतो हा एक महत्वाचा विचार खुप सोप्या पद्धतीने त्यांनी लोकांना फक्त सांगितलंच नाही तर प्रत्यक्षात शेतात राबून समाजाला दाखवून दिला .

संत सावता महाराजांचा जन्म 'अरण' या गावी झाला होता. लहानपणापासून घरी भक्तीभावाचे वातावरण असल्यामुळे त्यांना लहानपणा पासूनच विठ्ठलाची ओढ लागलेली होती पुढे लग्न झाल्यानंतर ते दिवसभर शेतीत राबायचे आणि रात्री भजन कीर्तन करायचे असा त्यांचा दिनक्रम ठरलेला असे. आपल्याकडील सर्वच महान संत जनांचा त्या त्या काळातील काही लोकांनी त्यांचा प्रचंड छळ केलेला आहे. त्यांना त्रास दिलेला आहे आणि त्याच प्रकारे असे अनेक प्रसंग संत सावता महाराजांच्या वाट्यालाही आले.

शेतीत रमणारे सावता महाराज, भक्तीभावामुळे त्यांचा मळा आणि त्यांचे नाव एक प्रकारे हळू हळू फुलत चालले होते पण कर्मठ लोकांना हे पहावत नव्हते. एकदा शेतात सावता महाराजांनी भगवा शेंदुर लावलेल्या दगडाला नांगर चालवत असताना मध्येच आला म्हणून उचलून बाजूला ठेवले आणि त्याच दरम्यान गावात पटकी नावाचा रोग पसरला होता. आणि त्या कर्मठ लोकांना एक प्रकारे चांगली संधी चालून आली. त्यांनी गावकऱ्यांना असे सांगितले की सावता महाराजांनी देव हलवला, त्याची विटंबना केली म्हणून हा रोग सर्व गावभर पसरला आहे आणि त्याची शिक्षा म्हणून त्यांनी तो दगड पुन्हा तिथे आणून ठेवावा, एका बकऱ्याचा बळी द्यावा आणि ती शेती सोडून निघून जावे असे ठरवण्यात आले. पण सावता महाराजांनी त्यांना वारंवार विनंती करून समजावून सांगितले की हा देवाचा कोप वगैरे नसून, पटकी हा रोग दूषित पाण्याने आणि अस्वच्छतेमुळे पसरला आहे. पण शेवटी काही दिवसानंतर अचानक गावातील लोकांचा एक खूप मोठा झुंड त्यांच्या शेतावर चालून गेला. शेतीतले सर्व पीक त्यांनी बेचिराख



केले आणि ते बकऱ्याला तिथून घेऊन जात असताना सावता महाराजांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला आणि त्या लोकांनी सावता महाराजांना सुद्धा खूप मारले. शुद्धीवर आल्यानंतर त्यांना प्रचंड दुःख झाले . ते दुःख या गोष्टीचे नव्हते की सर्व शेतीतील पिकांची नासधूस झालेली होती त्यांना दुःख या गोष्टीचं होतं की की गावकऱ्यांनी निर्जीव दगडाला देव मानून कोप झाल्याची अंधश्रद्धा लक्षात घेऊन एका बकऱ्याचा बळी दिला.अशा प्रसंगातून आपल्याला त्यांचा आधुनिक भक्ती मार्ग दिसून येतो.

असे बरेच दिवस जात गेले उत्तरोत्तर सावता महाराजांची कीर्ती गावोगाव पसरू लागली पण ती कीर्ती काहींना जळफळाट करायला लावणारी होती. तसेच ओमकार स्वामी आणि कामाजी माळी यांनाही ते सहन होईना म्हणून त्यांनी एकदा बऱ्याच लोकांना काठ्या घेऊन सावता महाराजांच्या मळ्यात पाठवले आणि पूर्ण पिकांची नासाडी केली मळ्यातील विहीर बुजवण्यात आली सावता महाराजांनाही मारण्यात आले असते पण योगायोगाने ते त्यादिवशी शेतात नव्हते. परत आल्यानंतर महाराजांनी हे सर्व बघितलं पण त्यांनी विरोधकांच्या नावाने बोंबाबोंब केली नाही. फक्त विठ्ठलाला प्रश्न केला की "या विरोधकांची बुद्धी अशी भ्रमिष्ट कशी रे"? सावता महाराज खचणाऱ्यातले नव्हते . त्यांनी पुन्हा कामाला सुरुवात केली पण यावेळी ते खूप अवघड होते सगळं नव्याने उभा करावा लागणार होतं .त्यांनी ते चालू केले यावेळी गावकरी सगेसोयरे ही त्यांच्या मदतीला धावून आले. यावरूनही आपल्याला सावता महाराजांची चिवट वृत्ती लक्षात घेता येईल. विरोधकांनी त्यांना वारंवार त्रास दिला पण ते डगमगले नाही त्यांनी त्यांचा भक्तिमार्ग सोडला नाही. मळा पुन्हा फुलला. त्यात केळीच्या बागा, वेगवेगळी फुल झाडे ,औषधी झाडे,वड ,पिंपळ आणि औदुंबरा सारखे मोठमोठे वृक्ष होते. त्यांच्या कष्टाने भरलेला मळा हा एखाद्या तीर्थस्थळा पेक्षा काही कमी नव्हता .

“कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी

लसून मिरची कोथिंबिरी, अवघा झाला माझा हरी

ऊस गाजर रताळू ,अवघा झालासे गोपाळू

मोट नाडा विहीर दोरी अवगी व्यापली पंढरी”

सावता महाराजांविषयी तशी खूप कमी माहिती उपलब्ध आहे पण जेवढे प्रसंग आपल्यासमोर आलेले आहेत त्या एका एका प्रसंगातून खूप काही शिकण्यासारखे आहे. अशा संतांचे चरित्र इतिहासकार अभ्यासक, उत्तम वक्त्यांच्या माध्यमांसमोर आजच्या तरुणांसमोर यायला हवे तर निश्चितच एक संस्कारक्षम पिढी तयार व्हायला मदत होईल पण अशा संत जनांचा वापर फक्त आपली

राजकारणाची पोळी भाजून घेण्याकरता करणे म्हणजे हा त्यांचा घोर अपमान आहे . म्हणून आपणच मिळून आजच्या तरुणांसमोर कर्मयोगातून भक्तियोग साधणारे सावता महाराज सर्वांपर्यंत प्रयत्न करूया.

- प्रविण वैद्य.





## समाज घडविणारे
# संत गोरोबा महाराज

`तुझे रुप चित्ती राहो। मुखी तुझे नाम।

देह प्रपंचाचा दास। सुखी करी काम।। देहधारी जो तो त्याचे। विहीत नित्यकर्म।

तुझ्या परी वाहिला मी। देहभाव सारा।।

उडे अंतराळी आत्मा। सोडुनी पसारा।।


नाम तुझे घेतो गोरा। होऊनी निष्काम।।

`भक्ताचा अनन्यभाव व्यक्त करणारा हा अभंग म्हणजे उत्कटतेचा बिंदू आहे. गोरोबा म्हणतात की, "भक्तीसाठी मनाचा निर्मळपणा हवा. त्यासाठी संतसंगती हवी."

तेरे ढोकी या गावी गोरा कुंभार राहत. गोरा कुंभार हे नेहमी भगवान विठ्ठलाची भजन, भक्तीगीते गात आणि काम करत असतानाही पांडुरंगाच्या नावाचा जयघोष करण्यात एकांतवासात असायचे. एकदा त्यांची पत्नी ते काम करत असलेल्या अंगणात आपल्या लहान बाळाला सोडून पाणी आणण्यासाठी गेली. गोरा कुंभार मातीची भांडी बनविण्यासाठी लागणाऱ्या चिखल तुडवण्याच्या तयारीत व्यस्त होते आणि पांडुरंगांच्या भजनामध्ये दररोजच्या प्रमाणे मग्न होते. त्यांचा मुलगा त्यांच्याजवळ असताना

खेळत खेळत भांडी तयार करण्यासाठी असलेल्या खड्ड्यात पडतो. गोरा कुंभार पांडुरंगाच्या भजनांमध्ये मग्न असल्यामुळे त्यांना स्वतःला सुद्धा कळत नाही की ते स्वतःच्या मुलाला पायाखाली चिरडत आहे. पांडुरंगाच्या भजनांमध्ये ते इतके तल्लीन होते त्यांच्या मुलाचे ओरडणे सुद्धा त्यांना ऐकू आले नाही.

गोरा कुंभार यांच्या पत्नी घरी आल्यावर मुलाची शोधाशोध करते. मात्र मुलगा कुठेही सापडत नसल्यामुळे ती गोरा कुंभारांकडे मुलाची चौकशी करण्यासाठी जाते. तेथे तिचे डोळे रक्ताने लाल झालेल्या चिखलावर पडतात. तिला समजते कि तिचे मुल गाळात चिरडले गेले. ती दुःखाने रडू लागते. या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून गोरा कुंभार त्यांचे दोन्ही हात तोडतात. यामुळे त्यांच्या कुंभारकामाच्या व्यवसायाला मोठा धक्का बसतो. त्यानंतर भगवान विठ्ठल आणि देवी रखुमाई त्यांच्या घरात मजुरांच्या वेषात राहू लागतात. त्यांच्या व्यवसायाला चांगला प्रतिसाद मिळू लागतो. नंतर चार-पाच वर्षानंतर बाळ तिला परत मिळत, हे दृश्य पाहून सर्वांना आनंद होतो. अशी एक गोष्ट त्यांच्याबद्दलची प्रचलित आहे. आतापर्यंत अनेक संत होऊन गेले ज्यांनी स्वतःच्या आयुष्यामध्ये दुसरं काही न करता फक्त पांडुरंगाच्या म्हणजे विठ्ठलाच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण करून विठ्ठलाच्या नामस्मरणात मग्न झाले आहेत.



गोरा कुंभार या संतांमध्ये अग्रस्थानी येतात. संत गोरा कुंभार हे गोरोबा म्हणून ओळखले जातात. हे भक्ती आणि महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाशी संबंधित संत होते. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामध्ये यांचे योगदान फार महत्वाचे आहे.त्यांनी भक्तीचा मार्ग सोपा करून सांगितला. सर्व जाती-जमातीतल्या भक्तांना नामस्मरणांची संधी उपलब्ध करून दिली. जे आतापर्यंत वंचित होते. ज्यांना देवधर्माच्या उच्चार करता येत नव्हता, असे अठरा पगड जाती-जमातीतले लोक नामस्मरण करु लागले.

सर्व समाजात आनंदीआनंद पसरला.आजही असंख्य कुटुंबे म्हणजेच वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात.


संसारातील अनेक प्रश्न विसरून विठ्ठलाच्या चरणी आपले सर्वस्व अर्पण करतात. संतांच्या विचारांतून भक्तीचा मार्ग

मोकळा होऊन आणि विठ्ठलाच्या नामस्मरणांचे साधन स्वतः हाती घेऊन समाजाचा उद्धार होऊ शकतो. असं समाजातील सर्व लोकांना पटवून सांगण्याचं काम त्यांनी केलं. विशेष करून, भक्तिमार्गाचा आदर्श समोर ठेवून लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी हाती घेतले. जात-धर्म विसरून चांगल्या विचारांनी सर्व वातावरण भक्तिमय करून पाहणाऱ्या संतांचे हे कार्य आपण लक्षात घेतले पाहिजे. संतांचे ज्ञान सर्वांना कळू शकेल, या संत परंपरेत गोरोबा कुंभार हे एक महत्त्वाचे संत होते. त्या काळाच्या सर्व संतांमध्ये ते वयानी मोठे होते म्हणून त्यावेळेसचे संत त्यांना आदराने गोरोबा काका म्हणत.

गोरोबा एकदा भजनात रमले की, सर्वच काही विसरून ईश्वराशी एकरूप होत. भजन अनेक  लोक करतात, परंतु गोरोबांची विठ्ठलभक्ती खूप वेगळी होती.त्यांना जणूकाही विठ्ठलाचे वेडच लागले होते. आपल्या स्वतःच्या व्यवसायावर त्यांची खूप  निष्ठा होती. त्याचप्रमाणे गोरा कुंभार व्यवसाय करत असताना सुद्धा त्यांची ईश्वरावर खूप श्रद्धा होती. श्रेष्ठ भक्तीभाव याचे प्रतीक गोरोबा होते म्हणूनच ते सर्वांचे श्रद्धास्थान ठरले. ज्ञानेश्वर नामदेवांनी सुद्धा गोरोबांचे मोठेपण मान्य केले आहे. अनेक संत साहित्यिक महाराष्ट्रात होउन गेले. त्यांनी सुद्धा त्यांच्या स्वतःच्या जीवनात अनेक प्रसंगावर मात करून पुन्हा नव्याने उभे राहण्याचे धाडस करून दाखवले आहे.

-राजीव पवार





## सर्वसमावेशक

# संत नामदेव महाराज

जीवनाच्या सर्व क्षेत्रांत जीवनमूल्यांची घसरण होत आहे. जागतिकीकरण आणि खाजगीकरण झपाट्याने होत आहे. दहशतवाद, अस्थिर राजकीय परिस्थिती, अनामिक भीती यांनी आपले जीवन वेढले गेले आहे आणि म्हणूनच ह्या परिस्थितीत संत सहवासाची, साहित्याची आपणा सर्वांना गरज आहे. विविध प्रांतांतील भारतीय संतांनी विविध भाषांना आपल्या संतवाणीने समृद्ध केले आहे. करुणा, सौजन्य, सहिष्णुता, बंधुभाव, सामाजिक व वैचारिक तत्वज्ञानाचा प्रसार आपल्या अभंग, ओवी, पदे, दोहे अशा सोप्या बोलीभाषेमधून त्यांनी केला.

सन ११९२ साली संत नामदेवांचा जन्म झाला. एकूण ऐंशी वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. ज्ञानदेव व नामदेव हे समकालीन. ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीनंतर जवळजवळ चोपन्न वर्षे नामदेवांचे कार्य अविरत, अखंड सुरू होते. आपले मर्यादित क्षेत्र न ओलांडणाऱ्या आमच्या मराठी मनोवृत्तीला संत नामदेवांनी त्याकाळी छेद दिला. तीर्थयात्रेच्या निमित्ताने गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब आदी प्रांतांमध्ये जाऊन आपले अनेक शिष्य तयार केले. जुलमी यवनांच्या राजसत्तेला कंटाळलेल्या पिचलेल्या लोकांना धीर दिला. संत नामदेव हे ७०० वर्षांपूर्वी केलेल्या राष्ट्रीय एकात्मतेचे पहिले उद्गाते आहेत असे ठामपणे म्हणायला हरकत नाही.

नामदेवांनी कर्मकांड, पूजा, मंत्र-तंत्र, बुवाबाजी, दांभिकता, अनीती आणि श्रेष्ठ-कनिष्ठतेने ग्रासलेल्या समाजात आपल्या अभंगातून कीर्तनातून नामस्मरणाचेच महत्त्व पटवून दिले. अंधश्रद्धेपासून लोकांनी दूर राहावे अशी शिकवण दिली. त्यांची शिकवण आपण आचरणात आणून आपले जीवन समृद्ध केले पाहिजे.

अगदी लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. पांडुरंगच त्यांचा सर्वकाही होता. आई-बाप, सोयरा-सखा, गुरू -देव, स्वामी तोच होता. विठ्ठलाशी ते संवाद साधत. या बालभक्ताच्या हट्टापायी विठ्ठलाने दुधाचा नैवेद्य सेवन केला, अशी प्रसिद्ध आख्यायिका आहे. पुढे दगडाचा देव बोलत नाही, अशी आपल्या अभंगातून ग्वाही देणा-या नामदेवांनी लहानपणीच आध्यात्मिक क्षेत्रात मोठाच अधिकार प्राप्त केला होता एवढं मात्र यातून नक्कीच म्हणता येईल. पण, नामदेवांची दुसरी कथा यापेक्षाही महत्त्वाची आहे. सुकी भाकरी पळवून नेणा-या कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन जाणारे नामदेव, देवाला दूध पाजणा-या नामदेवांपेक्षा नक्कीच महत्त्वाचे आहेत. ते लहान वयातच सर्वांभूती भगवंत पाहू शकत होते, हे महत्त्वाचे.



नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ, शास्त्रज्ञांकडे हेलपाटे घातले. पण, ज्ञातिहीन नामदेवांना कोण उभं करणार ? त्यामुळे त्यांनी भक्तीतून म्हणजे थेट भगवंतालाच आधार मानून स्वत:च बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला.

नामदेव, ज्ञानदेव भेटीतून विचारांचा नवा प्रवाह उदयाला येत होता. ज्ञान आणि भक्तीचा हा संगम होता. त्यातून कीर्तनाच्या रंगी नाचत देशभर ज्ञानदीप लावण्यासाठी दोघांच्याही प्रभावातली सगळी संतमंडळी एकत्र झाली. त्यांची एकत्र तीर्थयात्रा सुरू झाली. महाराष्ट्र पिंजून गुजरात, राजस्थान आणि पंजाबपर्यंत हे संत गेले. माणसाला माणूस बनवण्याची ही धडपड होती. नामदेव कीर्तन करत. चोखामेळ्यासारखे अस्पृश्यही टाळकरी बनून त्यांना साथ देत. जनाबाईंसारखी जातीने अतिशूद्र असणारी स्त्री कीर्तनाचं संचलन करी. ज्ञानदेव अभंग सुचवत. अशा जाती-पातीच्या भिंती तुटत होत्या. गोरा कुंभार, सावता माळी, परिसा भागवत, चोखा महार आणि त्यांचा परिवार, जगन्मित्र नागा, नरहरी सोनार, दासी

जनी सगळेच त्यात होते. पंजाबातून जाल्हण सुतारही पंढरपुरापर्यंत सोबत आले. हे संत म्हणजे, टाळकुटे विरक्त नव्हते, तर त्या- त्या समाजांचे धार्मिक, वैचारिक आणि सामाजिक नेतेच होते.

हिंदी साहित्याला नामदेवांनी नवे भान दिले. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता, मलूकदास अशी संतांची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. तिथे त्यांनी केलेल्या मशागतीतून शीख धर्माचा वटवृक्ष उभा राहिलाय. नारायण आणि नामदेव एकच आहेत असं मानणा-या शीख परंपरेच्या गुरू ग्रंथसाहेबातही नामदेवांची ६१ पदं आहेत.

नामदेवांचा देशभरावरचा प्रभाव आजही पाहता येतो. महाराष्ट्र आणि पंजाबाबरोबरच राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यांत त्यांची मंदिरं आहेत. तामिळनाडूपासून जम्मूपर्यंतचे लाखो लोक त्यांचं नाव एकतर आडनाव म्हणून किंवा जातीची ओळख म्हणून अभिमानाने मिरवतात.

३ जुलै १३५० रोजी वयाच्या ऐंशीव्या वर्षी त्यांनी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या पायरीवर आहे, तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे.

- अविनाश मगर







### माऊली

# संत ज्ञानेश्वर


वारकरी संप्रदायाच्या सुरुवातीच्या काळातील महत्वाच्या संतांमध्ये संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांचे नाव हे अग्रस्थानी येते. १३ व्या शतकात होऊन गेलेल्या ज्ञानेश्वरांचे कार्य जनतेला नेहमी योग्य मार्ग दाखवत आलय. प्रेम, करूणा, भूतदया व  स्वावलंबन या गोष्टींचा अंतर्भाव त्यांच्या अभंगातून दिसतो. अल्पायुष्य लाभलेल्या या संताने आपल्या जीवनकार्यात अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, ज्ञानेश्वरी, निवडक अभंग आणि हरिपाठ यांची निर्मिती केली.

ज्ञानेश्वर यांचे मूळ नाव ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी. त्यांच्या आई-वडिलांना प्रायश्चित्त म्हणून देहदंड सुनावण्यात आला होता. आपल्यामुळे आपल्या मुलांची हेटाळणी नको म्हणून त्यांच्या आईवडिलांनी देहांत प्रायश्चित्त घेतले. लहानपणीच आलेल्या या अनुभवातून ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे (निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई) ही विचारांनी प्रौढ व व्यावहारिक झाली. ज्ञानाचे क्षेत्र एका ठराविक, सनातनी व विचारांनी बुरसटलेल्या समाजाकडे न राहता ते तळागाळातल्या समाजापर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी गीतेवर टीका करणारा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिला. संत वाङ्मयाचं वैशिष्ट्य म्हणजे कोणताही किंतु मनात न धरता आपलं समाजावरील अभ्यासपूर्ण निरीक्षण समाजापर्यंत सोप्या भाषेत कसं जाईल यासाठी करण्यात आलेल संतांचं लिखाण. संत ज्ञानेश्वरांनी या

विचारांचा पाया रचला. आपण जातीने किंवा धर्माने महान न ठरता आपल्या कार्याने महान ठरतो याचा प्रत्यय ज्ञानेश्वरांनी पौगंडावस्थेतच करून दिला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली.

संत ज्ञानेश्वर व संत नामदेव हे समकालीन संत होते. नामदेवांनी वारकरी संप्रदायाची पताका पंजाबपर्यंत रोवली. त्याचवेळी ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रात तळागाळातील लोकांपर्यंत वारकरी संप्रदायाची शिकवण पोहोचवत होते. लहानपणापासून मिळणारी हेटाळणी, दुजाभाव व वेगळी वागणूक याचा दुराग्रह मनात न ठेवून त्याच समाजाच्या हितासाठी अहोरात्र संत ज्ञानेश्वर व त्यांचे भाऊ बहीण झटले. हेच तर एका खऱ्या समाजसुधारकाची लक्षणं आहेत.

संतांबद्दल अनेक आख्यायिका आपल्याला समाजात ऐकायला मिळतात. संत ज्ञानेश्वर ही याला अपवाद नव्हते. पण दुर्दैवाने आपल्याला या आख्यायिकांच्या मागील मतितार्थ कळत नाही. आपण याचे एक उदाहरण घेऊ.



"ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद वदवून घेतले"

मुळात अंधश्रद्धा, उच्चनीचता व  दुजाभाव यांना विरोध करणे हे प्रत्येक संताचे एक सार्वकालिक वैशिष्ट आहे. माझ्या मते, या आख्यायिकांच्या मागील मतितार्थ हा वेगळा आहे. मुळात त्याकाळी सामान्य तळागाळातील लोक हे रेड्यासारखे ढ्रिम होते. शिक्षण, अधिकार व सद्सदविवेकबुद्धी  याचा उपयोग करण्याची सवय त्या समाजाला नव्हती. वर्षानुवर्षे एका ठराविक समाजाच्या खालीच सामाजिक ,आर्थिक, शैक्षणिक ,धार्मिक आणि तत्सम मार्गाने दबावात राहिल्यामुळे

तो समाज अज्ञानी होता. ज्ञानेश्वरांनी त्याच समाजरूपी रेड्याला वेदांच (ज्ञानाचं) महत्व पटवून दिले. एक संत साहित्याचे जिज्ञासू वाचक आणि अभ्यासक म्हणून आपण या सर्व आख्यायिकांकडे तटस्थ व व्यावहारिकपणे बघून त्यातला मतितार्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

संत ज्ञानेश्वरांनी पसायदान हे सर्व 'विश्वाला समर्पित केले आहे'. त्यातील एका ओळीचा अर्थ आपण जाणून घ्यायचा प्रयत्न करू.

दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो

जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात

संतांचे लिखाण हे अत्यंत व्यावहारिक दृष्टीने लिहिलेले असते. त्यामुळे प्रत्येकाच्या विचारांच्या व्यापकतेनुसार प्रत्येकजण यातून अर्थ मिळवतो. ज्ञानेश्वरांनी या ओळींतून स्वतःला आलेल्या कटू अनुभवातून समाजाला योग्य समज देण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात की, दुष्टांच्या दुष्टपणाचा अंत होऊन सत्कर्म करण्याची बुद्धी दुष्टांना मिळो. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे एकमेकांसोबत मित्रत्वाचे नाते राहो. प्रत्येक प्राणिमात्रांकडे आपण मित्रत्वाच्या नात्याने पाहो.

चराचरात विठ्ठल भासतो याचा अर्थच मुळात चराचरात "मित्रत्वाची" भावना दिसते असा होतो. संत ज्ञानेश्वरांना प्रेमाने "माऊली" म्हणतात. ज्या संताचे विचारच मुळात आपुलकीने सुरू होऊन आपुलकीने संपत असतील ती तर "माऊलीच" ठरते.

संतांकडून सामान्य जनतेने काय शिकावे तर समाजसुधारणेसाठी सर्वस्व पणाला लावण्याची त्यांची निस्वार्थ तयारी. संत कधी जन्माला आले? कधी निधन पावले? त्यांचं नाव काय? त्यांनी जन्म कुठे घेतला? त्यांच्याबद्दल आख्यायिका कोणती? या गोष्टींचा विचार करण्यापेक्षा त्यांना संत का म्हटलं जातं? समाजासाठी त्यांनी सर्वस्व पणाला का लावलं? संतांचं नेमकं म्हणणं काय होतं? संत साहित्य का वाचावं? असे प्रश्न जोपर्यंत आपल्याला पडत नाहीत तोपर्यंत संतांचे कार्य व त्यांची महती आपल्याला खऱ्या स्वरूपात समजू शकत नाही.

- संदेश हनुमंत डोळसे.



# संत नरहरी महाराज

मराठी संत साहित्य परंपरेला समृद्ध करण्याचे कार्य अठरापगड जातीतील संतांनी केले. त्यामध्ये संत तुकारामांपासून ते संत चोखामेळा आणि संत सावता माळींपासून ते संत गोरा कुंभारांपर्यंत ही तत्त्वज्ञानाची परंपरा अखंडपणे चालत आलेली आहे.

मनामध्ये चांगला भाव असेल तर भक्तीमार्गात कोणतीही जात किंवा धर्म आड येत नाही,याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विठ्ठलावरील असलेली अठरापगड जातींच्या संतांची भक्ती. आणि त्या संतांपैकी एक संत म्हणजेच संत शिरोमणी नरहरी सोनार होय. त्यांचा जन्म १३१३ मध्ये पंढरपूर येथे झाला. संत शिरोमणी नरहरी सोनार यांचा व्यवसाय दागिने बनवण्याचा होता,परंतु त्यांची विठ्ठलावर असलेली भक्ती अपार होती. संत नरहरी सोनार यांनी तत्कालीन समाजात वावरतांना अभंगांची निर्मिती केलेली दिसते. त्यांचे देवा मी तुझा सोनार आणि पापांचे पर्वत मोठे मोठे झाले हे अभंग तत्कालीन समाजाला दिशा दाखवणारे ठरतात. त्याबरोबरच या अभंगातून त्यांची विठ्ठलावरील श्रद्धा लक्षात येते. तत्कालीन समाजाच्या मानसिकतेत बदल घडविण्यासाठी संत शिरोमणी नरहरी सोनार यशस्वी ठरलेले दिसतात.संत नरहरी सोनार यांची शिकवण किंवा तत्वज्ञान  समाजाला उपयोगी असले तरीही दुर्देवाने आजही समाजातील असंख्य जनता अंधश्रद्धेला बळी पडलेली दिसते.

मराठी साहित्याला अगदी संत साहित्यापासूनची परंपरा आहे. समाजातील चालीरीती, भेदभाव, अंधश्रद्धा, कर्मकांड घालविण्यासाठी संतांनी अभंगांची रचना करून समाजसुधारणेची मोहीम हाती घेतली. ही परंपरा अखंडपणे चालत आली आहे. आणि याच परंपरेतून संत शिरोमणी नरहरी सोनार यांनी अभंगांची रचना केली आणि समाजाला उद्‍बोधन केले.



कोणताही संत हा कुठल्याही जातीचा किंवा धर्माचा नसतो. हे समजण्याची गरज आजच्या समाजाला आहे. संत शिरोमणी सोनार जरी असले तरी त्यांच्या कार्याचा विस्तार हा कुठल्याही एका विशिष्ट वर्गापर्यंत मर्यादित नाही. एकूणच संत नरहरी सोनार यांच्या कार्याचा विचार बघता त्यांनी समानतेचे तत्त्व अंगीकारलेले दिसते. समाजात कोणत्याही एका गटाचे वर्चस्व नसावे तर सर्वांना समान वागणूक असावी आणि जाती-धर्माच्या नावाखाली न वागता माणुसकीने वागावे अशी त्यांची शिकवण आजच्या समाजाला एक संदेश देऊन जाते.


- उमेश विष्णुलक्ष्मी इंगळे



## कविवर्य

# संत चोखामेळा महाराज

इ.स. 1338 च्या यादव काळातील नामदेवांच्या संत चळवळीतील वारकरी संत कवी म्हणून संत चोखामेळा प्रख्यात आहेत. संत चोखामेळा जातीने महार असल्यामुळे ते तत्कालीन विषमतेने होरपळून निघाले होते. ते शूद्र उच्चनीचता व वर्णव्यवस्था या विळख्यात अडकले होते. गावातील शिवाशिवीचा नीच व्यवस्थेत त्यांचा जीव कोंडला जात होता. पण तरीही ते विठ्ठलाच्या नामस्मरणात नेहमीच दंग असत. महार म्हणून जन्माला आल्यानंतर किती यातना सोसाव्या लागतात त्यांनी आपल्याच 'जोहार मायबाप' या अभंगात मांडल्या आहेत.



जोहार मायबाप जोहार । तुमच्या महारांचा मी महार॥

बहु भुकेला झालो । तुमच्या उष्ट्यापाशी आलो ॥

बहू केला आस । तुमच्या दासाचा मी दास ॥

चोखा म्हणे वाटी । आणि तुमच्या उष्ट्यासाठी ॥







वर्णव्यवस्थेच्या सनातनी काळात शूद्रांचे काय हाल होत होते ते संत चोखामेळा यांनी अतिशय करूण शब्दात मांडले आहेत. चोखामेळा म्हणतात की,"नमस्कार मायबाप तुमच्या गावकुसाबाहेरच्या महारांचा मी महार. खळबळून भूक लागली आहे. पोटात अन्नाचा कणही नाही. म्हणून तुमच्याकडे अन्न मागायला आलो. मी तुमचा आयुष्यभर सेवक म्हणून राहील तुमची सेवा करीन. पण माझ्या झोळीत शिळपाक, उष्ट  जे असेल ते अन्न द्या" इतक्या सरळ आणि सोप्या शब्दात संत चोखामेळा यांनी तत्कालिन परिस्थिती शब्दबद्ध केली आहे.

भेदभाव,शिवाशिव, जातीपाती, गावगाडा आणि सनातनी वर्णव्यवस्थेचे अमानुषतेचे जुलमी चटके चोखोबांनी खूप सोसले म्हणूनच त्यांच्या अनेक अभंगातून विद्रोह धगधगत असतो.

धाव घाली विठू आता चालू नको मंद ।

बडवे मज मारिती ऐसा काहीतरी अपराध ॥

नीच वर्णव्यवस्थेमुळे शूद्रांना खूप अन्याय, अत्याचार सहन करावा लागत होता हा अन्याय पाहून संत चोखोबा विठ्ठलाला हाक मारत आहे. विठ्ठला धावत येरे वाचव आम्हाला या दुःखातून, तुझ्या मंद चालीला वेग आण.हे बडवे बघ आम्हाला चूक नसतानाही मारत आहे.

विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला ।

शिव्या देती म्हणती महारा देव बाटविला ॥

"विठ्ठला, तुझ्या भक्तीपोटी मी तुझे स्मरण करतो. तुझी भक्ती करावी म्हणून मी तुझ्या नामस्मरणात दंग असतो. या बडव्यांना  त्याचा त्रास होतो ते म्हणतात की, ‘शूद्रांच्या मुखी विठ्ठलाचे नाव कसे?’ असे म्हणून ते शिव्या देतात की महारांनी देव बाटवला."

अहोजी महाराज तुमचे द्वारीचा कुतरा ।

नकाजि मोकलू चक्रपाणि जिम्मेदारा ॥

चोखोबांना शिव्या देणाऱ्यांना ते  उद्देशून म्हणतात, " आहोजी महाराज तुमच्या दारातला कुत्रा त्याला चक्रपाणी ची जबाबदारी नका देऊ"

जोडूनिया कर दोन्ही विनवीतो देवा ।

बोलीला उतरी परी राग नसावा ॥

रागात बोलण्याने जर दुखावले असेल तर क्षमा याचना म्हणून चोखामेळा म्हणतात, "दोन्ही हात जोडून विनंती करतो, रागात बोललो असेल बरे वाईट, तर माफ करा मनात राग धरू नका"

संत चोखामेळाला समाजाने जरी दूर लोटले असले तरी मात्र परमेश्वराने त्यांना जवळ केले होते. त्यांना विठ्ठलाच दर्शन घेण्याची खूप आस होती. परंतु त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्यांनी आयुष्यभर विठ्ठलाला दारातूनच नमस्कार केला आणि तिथेच विठ्ठलाचे नामस्मरण केलं. त्याच पार्श्वभूमीवर ते लिहितात.

उंबरठ्याशी कैसे शिवू ? आम्ही जाती हीन ।

रूप तुझे कैसे पाहु ? त्यात आम्ही दीन ।

पायरीशी होऊ दंग गावूनी अभंग ।

चोखा म्हणे नाम घेता भक्ती होते दंग ॥

- प्रेम त्रिभुवन





# संत जनाबाई



संतांचा उल्लेख केला की आपल्याकडे संत तुकोबा यांचे नाव अत्यंत सहजपणे तोंडातून निघते. त्याचप्रमाणे जात्यावरच्या ओव्या म्हटल्या तर संत जनाबाई यांचे नाव प्रथमतः तोंडी येते. संत जनाबाई जात्यावर ओवी गात असताना अगदी परमेश्वराशी एकरूप होऊन दळण दळत असत. त्या स्वतः नामस्मरणात इतक्या गुंतून जात की त्यांच्यासोबत परमेश्वरच बसला असावा. तसेच त्यांचे अभंगपण अविस्मरणीय आहेत.

झाडलोट करी । केर भरी चक्रपाणि ।।

पाटी घेऊनिया शिरी । नेउनिया टाके दूरी ।।

ऐसा भक्तीस भुलला । नीच कामे करू लागला ।।

जनी म्हणे विठोबाला । काय उत्तराई होऊ तुला ।।

जनाबाई म्हणतात मी झाडलोट केली तर माझा श्रीहरी केर उचलतो, दूर जाऊन फेकून देतो. माझ्या भक्तीला माझा विठ्ठल असा भुलला की माझी सर्व कार्य करू लागतो. यांची परतफेड मी कशी आणि कोणत्या प्रकारे करणार आहे ?

विठ्ठला मी तुला कशी उतराई होऊ. त्यांना संतसंग नामदेवांमुळे लाभला. श्री संत नामदेव, संत विसोबा, संत जनाबाई अशी गुरु परंपरा आपल्याला पाहायला मिळते. संत नामदेवांच्या काळातील सर्व संतांना जनाबाईंनी प्रत्यक्ष पाहिलेलं आहे. ज्ञानदेवांविषयी त्यांना आदर होता. घरातील प्रत्येक कार्य  जसे शेण काढणे, गवऱ्या वेचणे, हे करत असताना जनाबाईंचे नामस्मरण अव्याहत सुरू असायचे.

परलोकी तारो। मने माझा ज्ञानेश्वरू।।

असे ज्ञानेश्वरांकरिता म्हणणारे संत नामदेव हे जनाबाईंचे पारमार्थिक गुरू. त्यामुळे यांच्या सहवासामुळे जनाबाईंना संत संग घडला. संत जनाबाईंच्या नावावर असलेले 350 अभंग ‘सकल संत गाथा’ या ग्रंथात समाविष्ट केलेले आहे. संत एकनाथ महाराज यांचे नातू महाकवी मुक्तेश्वरांना जनाबाईंच्या थाळीपाक आणि द्रौपद्री स्वयंवर या अभंगामुळे एक नवी चैतन्य स्फूर्ती मिळाली होती. बालक्रीडा, प्रल्हाद चरित्र, कृष्ण जन्म याविषयावर संत जनाबाईंनी भरघोस योगदान दिले. या संतपरंपरेने एक अशा मानवतेला जन्म दिला आहे की, जी कोणत्याही बंधनात अडकलेली नाही . या संत मंडळीच्या विचारांना जो मानव अवलंबून घेईल त्याचे विचार हे जलाप्रमाणे निर्मळ असतील. संत जनाबाईंना प्रत्येक गोष्टीत भगवंत दिसावे एवढे मनाचे चक्षू विशाल झालेले आपल्याला दिसतात. हा निर्विकार भाव जनाबाईंचे व्यक्तिमत्व कितीतरी उंचीवर नेऊन ठेवतो.

" एक ना, अवघे सार। वरकड अवघड ते असार। नाम फुकट चोखट। नाम घेता न ये वीट।।"

संत जनाबाईंच्या अभंगातील भाषा ही सर्वसामान्यांना अगदी सहज समजेल उमजेल अशीच आहे. त्यांच्या रचना हृदयाचा ठाव घेतात. नामदेव गाथेत सुद्धा संत जनाबाईंचे अभंग आपल्याला आढळतात. जनाबाईंचे काव्य वाचले असता काव्यातून त्यागीवृत्ती, सहनशीलता, स्त्रीच्या भावना उत्कटपणे दिसून येतात.

शेवटी संत जनाबाई पंढरपूरला विठ्ठलाच्या महाद्वारे शके १२७२ रोजी आषाढ कृष्ण त्रयोदशीला समाधिस्त झाल्या पांडुरंगाच्या चरणी लीन झाल्या.

- राहुल धबडगे, सचिन पन्हाळकर



श्रदधावंत

# संत एकनाथ महाराज

मी जन्मलो धन्यवंशी / म्हणोनी हरिभक्ती आम्हासी //

संत सोईरे निजसुखासी / वंश कृष्णासी निरविला /

संत एकनाथांचे आजोबा भानुदास महाराज हे विठ्ठल भक्त होते. पैठण सारख्या दक्षिण काशीत एका कुलीन घरात त्यांचा जन्म झाला. त्या काळी पंढरपूर चा भागवत धर्म हा पैठण मध्ये फार कमी लोकांना माहीत होता. भानुदास महाराजा विषयी फार थोडी माहिती आज मिळते, त्यात महत्वाची एक गोष्ट अशी की विजयनगर चा राजा कृष्णदेवराय पंढरपूरी आल्या नंतर त्यानि विठ्ठल मूर्ती ही त्यांच्या राज्यात घेऊन जायचं ठरवले व ते घेऊन गेले. पुढे काही दिवसानी वारकऱ्यांमध्ये ही गोष्ट माहिती झाली आणि भानूदास महाराजांना ही गोष्ट समजली. ते लगेच विजयनगरला गेले व विठ्ठल मूर्ति परत घेऊन आले. (म्हणून कदाचित आजचं पंढरपूर आपल्याला पाहायला मिळते) म्हणून संत एकनाथ महाराज म्हणतात की," मी धन्यवंशी जन्मलो आहे."

संत एकनाथ महाराजांचा जन्म साधारण शके १४५० जवळ सूर्यनारायण- रुख्मिणी या दाम्पत्याचा पोटी झाला. दुर्दैवाने त्यांचे आई व वडील वारले. भानुदासाच्या वंशात एकच मुलगा राहिला म्हणून त्याचे नाव 'एकनाथ' ठेवलं.

एकनाथ बालपणी पासून फार बुद्धिवंत व श्रद्धावंत होते. बालपणी स्नानसाधनेचि, हरिभजनाची, पुराणश्रवणाची, देव पूजेची आवड त्यांना होती. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांची मुंज झाली. आजी आजोबा सोबत विविध स्त्रोत्र त्यांनी बिनचूक पाठ केले. नाथाची बुद्धीमत्ता पाहून पुराणिकबाबाची घाबरगुंडी उडून जाई . वयाच्या बाराव्या वर्षी रामायण, पुराणातील रम्य कथा व भागवतातील ध्रुवपदे ऐकून त्यांच्या बुद्धीला विलक्षण सामर्थ्य प्राप्त झाले. आता नाथांना आपल्याला मार्ग दाखवणारा गुरु प्राप्त व्हावा ही इच्छा झाली. एकदा ते पहाटे शिवलयात पुजेस बसले असता आकाशवाणी झाली की," देवगडावर जनार्दनपंत नामक सत्पुरुष आहेत ते तुला कृतार्थ करतील." हे एकताच ते आजी आजोबांना विसरून थेट देवगिरी वर गेले व त्यांचा अनुग्रह घेतला. त्यांची गुरु भक्ति अपरंपार होती.

गुरु माझे माता पिता / गुरु आमुची कुळदेवता //

थोर पडता सांकडे / गुरु रक्षी मागे पढे //

काया वाचा आणी मन / गुरुचरणीच अर्पण //

एकजनार्दनी शरण/ गुरु एक जनार्दन//

जनार्दन स्वामी हे मूळचे चाळीसगावचे. पातशहाच्या सेवेत ते मुख्याधिकारी म्हणून देवगिरी वर नोकरी करत होते. त्यांची दत्त उपासना अधिक होती. त्यांना श्रीदत्ताच्या सगुण रुपाचे साक्षात दर्शन होत असे. नाथांनी पंतांची जवळपास सहा वर्ष पूर्ण सेवा केली, अगदी मनापासून सेवा आणि अपरंपार भक्ति केली. अगदी ‘गुरु;साक्षात परब्रह्म’ या भावनाने गुरुची अखंड सेवा केली. गुरु तोच भगवंत, गुरु तेच परब्रह्म, गुरुभजन तीच हरी पुजा. हे नाथ सतत सांगत आलेले आहेत. ही एकनिष्ठा पाहून जनार्दनस्वामींनी त्यास श्री दत्ताचे दर्शन करून देण्यास संकल्प केला.

एका जनार्दनी परब्रम्हपुतळा /

दत्त देखीला डोळा आत्मदृष्टी //

जनार्दन स्वामीच्या सोबतीने त्यांना दत्त दर्शन झाले. त्यावेळी दत्तांनी नाथाकडे पाहून सांगितलं की,"हा भागवत जन्मास आला असून हयाच्या हातातून भागवत धर्माचा प्रसार करेल, भागवतावर एक अपूर्व ग्रंथ लिहिल" नाथास खूप आनंद झाला. नाथास दत्त दर्शन झाल्यावर जनार्दन स्वामी त्यांना अनुष्ठानास बसायला सांगितले व देवगडच्या जवळच शुलिभंजन नावाच्या पर्वतावर अनुष्ठानास बसवले. त्यांना श्रीकृष्णमूर्तीचे ध्यान करावे असे संगितले. ध्यान परमभक्ति ने करून नाथास श्रीकृष्णाचे दर्शन झाले.पुढे तीर्थयात्रा करत ते द्वारके पर्यंत पोहचले आणि तिथे मराठी भाषेतील भागवत प्रसार केला.



आपल्या वयाच्या १२ व्या वर्षी घराबाहेर पडले व २५ व्या वर्षी कृथार्त होऊन परतले. पुढे गुरुमार्गदर्शनाने गृहस्थ आश्रम स्वीकारला. ज्या ठिकाणी गुरु चे गृहस्थ आश्रम स्वीकारण्याचे पत्र मिळाले त्याच ठिकाणी त्यांनी झोपडी उभारली. आज ही त्याच जागेवर नाथाचा वाडा पाहावयास मिळतो. वैजापूर येतील कन्या गिरिजाबाई सोबत त्यांचा विवाह झाला. एकनाथ – गिरीजा म्हणजे विवेक आणि शांती याच ऐक्यच. पुराण, कीर्तन, भजन व पुजा हा नाथांचा दिनक्रम असे. संसार सांभाळून गिरीजा देखील हरी चिंतनात त्यांच्या प्रमाणे सर्वकाळ चिंतन करत असत. नाथांना प्रपंच परमार्थ एकरूप होण्यास गिरिजबाईंचे मोठे साहाय्य होते. पुढे त्यांनी पैठण या ठिकाणी मोठा गोकुळाष्टमीचा उत्सव चालू केला आणि भागवत धर्माची ध्वजा फडकावली. त्या ठिकाणी कोणत्याही धर्माचा, पेशाचा,जातीचा व स्त्री-पुरुष हा भेद त्या ठिकाणी त्यांनी ठेवला नाही. नाथांनी ग्रंथ लिहीले व कथा लिहील्या, कीर्तने केली म्हणून त्यांची कीर्ती झाली असे नव्हे तर त्यांचे आचरण देखील तसेच होते. स्वस्त्री च्या पाठीवर बसणाऱ्या ब्राह्मणाला पुत्रा समान लेखणे, चोरास जेवू घालणे, पितरांसाठी केलेलं अन्न महारांस देणे, कवडीचे पाणी गाढवाला पाजणे, कृष्णदास लोळे या रामायण कर्त्या कवीचे मरण लांबवणे, नंदिला कडबा चारणे, या सारख्या गोष्टी मुळे त्यांचावर खूप आरोप देखील झाले आणि त्याच द्वारे त्यांचे सिद्धत्व देखील लोकांपर्यंत पोहचले.

साक्षात श्रीकृष्णांनी नाथाच्या घरी १२ वर्ष पाणी भरले, आज ही त्या ठिकाणी श्रीखंड्या रांजण म्हणून रांजण आहे. तो रांजण हा नाथ षष्ठी दिवशी सर्व भाविक भक्त मिळून भरतात. परंतु, असे संगितले

जाते की जो पर्यन्त देव कावड घेऊन त्यात पाणी टाकत नाही तो पर्यन्त तो रांजन भरत नाही. नाथ षष्ठी ही नाथमहाराजांनी त्यांच्या गुरुची पुण्यतीथी म्हणून सुरू केली. नाथांचे देहविसर्जन हे त्यांच्या गुरुंच्या पुण्यतिथि दिवशीच झाले. ह्या गोष्टीने त्याची अंपरंपार गुरु भक्ति दिसून येते.

त्यांचे कार्य हे सर्वधर्म समभाव, समानता दर्शवणारे ,स्त्री पुरुष समानता हा भाव दर्शवणारे आहे. त्यांनी भागवत, भावार्थ रामायण, सीता स्वयंवर, बोलीभाषेतील भारुड आणि अभंग अधिक प्रमाणात लिहले. त्यांचे ओवीबद्ध ग्रंथ असून पाच हजार अभंग देखील आहेत.

त्यांचे मराठी भाषेवर अतोनात प्रेम होते ते म्हणत की

‘ माझी मराठी भाषा चोखडी / परब्रम्हे फळली गाढी//..

ह्या भगवंत रुपी संताने पुढे गंगेला आपला देह समर्पित केला आणि आपले कार्य संपवले.

- सुप्रिया जाधव





## सार्वकालिक

# संत तुकाराम महाराज

आभाळाएवढ्या तुकोबांच्या विषयी आता मी फार काय लिहु ? खरं सांगायचं तर तुकोबा मला माझ्या घरातील सदस्याप्रमाणे वाटतात. ते आज प्रत्यक्षात बोलायला, रागवायला नसले तरी त्यांचे अभंग मला शाबासकीही देतात आणि चुकलो तिथे रागावततातही. मला तुकोबांनी काय शिकवलं असा जर प्रश्न केला तर उत्तर फार सोपे आहे त्यांनी मला 'एक चांगला माणूस म्हणुन जगायला शिकवलं'. मला ज्यावेळी एखादा प्रश्न पडतो त्यावेळी मी सरळ तुकोबांच्या गाथेत त्याचं उत्तर शोधतो आणि मला तुकोबा उत्तर देतात, त्यांच्या शब्दात, त्यांच्या शैलीत. 'तुकोबांचा महाराष्ट्राच्या भुमित झालेला जन्म हे त्यांनी या भुमिवर केलेले उपकार आहेत' असे मला वाटते. त्यांनी या भूमिवर जन्माला येउन जी वाट या समाजाला दाखवली त्याची परतफेड होणे शक्य नाही. तुकोबांचा जन्म भोळ्या लोकांना सत्य सांगायला झाला होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही ते स्वतःच म्हणतात की 'उजळावया आलो वाटा, खरा खोटा निवाडा'...

तुकोबांनी सत्यता सांगण्यासाठी कुठेलेही हत्यार हाती घेतले नाही, कुणालाही कधी प्रत्यक्ष इजा पोहोचवली नाही. ते ज्या विठ्ठलाला मानत होते त्याच्याच हातात मुळात कुठलेही हत्यार नाही. विठुराया चे हात कटेवर आहेत आणि तो शांत उभा आहे अशा विठुला मानणारा तुकोबा तरी हाती हत्यार कसा घेइल ?. तुकोबांनी हत्यार न घेता हाती घेतली ती 'लेखणी'. आणि या लेखणीने हत्याराहुन प्रभावी काम

केले. पण हे शक्य झाले तरी कसे ? तर केवळ 'अभ्यासाने'. तुकोबा म्हणतात की, अभ्यासच योग्य वाट आपल्याला दाखवतो. अर्धवट डोकी धोकादायक असतात पण एखाद्या गोष्टीचा पुर्ण अभ्यास केल्यावर आपण त्याबाबतची सत्यता पडताळु शकतो, अभ्यासु शकतो आणि हे त्यांनी आपल्या अभंगात मांडले आहे ते म्हणतात,

'असाध्य ते साध्य करिती सायास, कारण अभ्यास तुका म्हणे'

असाध्य असे काही नाही. आपल्याला हवे ते आपण मिळउ शकतो फक्त हवा तो Aim, हवे ते Vision आणि हवी ती Continuity! हि थिअरी आपण इंग्रजी पुस्तकात वाचल्यानंतर आपल्याला महत्वाची वाटते पण हीच गोष्ट तुकोबाराय चारशे वर्षांआधी सांगुन गेले ते म्हणतात कुठलीही असाध्य गोष्ट साध्य होउ शकते पण त्यासाठी तुमचे सातत्य आणि अभ्यास महत्वाचा आहे. म्हणुन बाकी गोष्टी बाजुला सारुन आपण अभ्यासाला पहिले प्राधान्य द्यायला हवे. तुकोबांनी आपल्या जिवनात ते अंगिकारले आणि ते 'जगद्‌गुरू' झाले....

तुकोबांनी त्यांच्या जिवनात सगळंकाही अनुभवलं. श्रीमंती, गरीबी, आपुलकी, द्वेष, मोह, भेदभाव या सर्वाच्या पलिकडे गेल्यानंतर 'तुकाराम बोल्होबा आंबिले' या सामान्य व्यक्तिपासुन ते 'जगद्‌गुरू तुकोबाराय' झाले. तुकोबांचा स्पष्टवक्तेपणा मला फार भावलाय आणि मी तो स्वतः अंगिकारलाय. ज्या ठिकाणी 'टणक' बोलायची गरज आहे तिथे 'छान, सुंदर' करण्याची गरज नाही जे मनात आहे तेच ओठावर हवे, नाहीतर मनात एक आणि ओठावर एक ठेउन समोरच्याला फसविण्याची किंवा कोरडी सहानुभुती दाखवण्याची किंचीतही गरज नाही असे तुकोबा वारंवार सांगतात. तुकोबा इतके परखड होते की त्यांनी त्यांच्या काही अभंगात शिव्या देखील वापारल्या आहेत. अर्थात ज्याच्याबद्दल वापरल्याय तो त्याच लायकीचा असेल त्यात शंका नाही. तुकोबा एका अभंगात म्हणतात की,

'देव्हाऱ्यावरी विंचु आला, देवपुजा नावडे त्याला। तेथे पैजाराचे काम, अधमाशी तो अधम'

ते म्हणतात देव्हाऱ्यावर जर विंचु आला तर देवपुजा त्याला आवडते असा त्याचा अर्थ होत नाही, त्यावेळी त्याला बेल, फुल वाहुन जमणार नाही अशावेळी पायातली पायतानं काढुन त्याला ठेचायचे असते. या अभंगात तुकोबांचा स्पष्टवक्तेपणा दिसुन येतो. तुकोबांचे व्यक्तिमत्व अत्यंत व्यावहारीक म्हणजे Practical होते. त्यांनी कधीच कुणाला उगाच सहानुभुती दाखवली नाही पण आज तर 'सगळे व्यवहार सहानुभुतीच्याच बळावर होतांना दिसत आहेत'. तुकोबांचे आयुष्य संघर्षाचे होते, त्यांनी स्वतःच म्हटलंय की 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग जग आणि मन अंतर्बाह्य' आणि या संघर्षानेच तुकोबांना व्यावहारिक बनविले. त्यांच्या एका अभंगात ते म्हणतात की

'अनुभव येथे व्हावा शिष्टाचार, न चालती चार आम्हापुढे'

तुकोबांची गाथा वाचल्यावर आपल्याला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे तुकोबांनी मांडलेले सर्व अभंग हे एक तर त्यांचे अनुभव आहेत किंवा त्यांनी पाहिलेली सत्यता आहे. आणि या अभंगात तुकोबांनी अशाच वाचाळ लोकांना 'टोचन' दिलेली आहे. ते म्हणतात अनुभव हि सत्यता आहे आणि सत्याचा आधार अनुभव आहे. अनुभवहीन गप्पा कुनी लोकांना सांगु नये आणि ज्या गोष्टी अस्तित्वातच नाहि त्या गप्पा सांगुन तुमची 'दुकाने' काही फार काळ चालणार नाहीत, आमच्या सत्यतेपुढे तुमच्या गप्पांचा निभाव लागणार नाही. लोक हुषार होतील आणि हुषार होत आहेत ते तुमच्या गप्पांना यापुढे फसणार नाहीत. आजपर्यंत कुणीही यावे आणि काहीही सांगुन जावे हे झाले पण यापुढे होणार नाही आम्हाला आमची बुद्धी आहे, आमच्या धडावर आमचे डोके आहे आम्ही तिचा वापर करु तेव्हा काहीही सांगतांना जरा विचारपुर्वक सांगा असे तुकोबाराय त्यांच्या या अभंगात बजावतात. तुकोबांचं व्यक्तिमत्व आभाळाहुन मोठं आहे काही शब्दात त्यांना मांडणं शक्यच नाही, लिहायला पानं अपुरे पडतील एवढे उंच तुकोबा आहेत. त्यांना समजुन घेण्याचा प्रयत्न आपण वेळोवेळी करत राहुया.

शेवटी मी एवढच म्हणेन की तुकोबा मला फार जवळचे आहेत, मला जेव्हा थकल्यासारखे वाटते तेव्हा ते मला आपुलकीने विचारतात, गाथेस्वरुपात ते माझ्याजवळ आहेत आणि सदैव राहातील.

'तुकोबा तुम्ही दाखवलेली वाट मी कधीही सोडणार नाही, कधी चुकलो तर हक्काने तुमची गाथा मला रस्ता दाखवेलच पण तुकोबा आज जर तुम्ही हयात असता तर......'

- आशुतोष सुनिल राहाणे पाटील.





## माणुसकीचा अर्थ सांगणारे

# संत सेना महाराज

संत सेना महाराज हे वारकरी संप्रदायातील एक संत. संत परंपरा जोपासत विठ्ठलाच्या नामाच्या जयघोषात, नामस्मरणात अनेक संतांनी जीवन व्यतीत केले त्यातलेच एक नाव म्हणजे संत सेना महाराज. इ.स. तेराव्या शतकात संत सेना महाराज यांचा जन्म मध्यप्रदेशातील बांधवगड येथे झाला. त्यांची मातृभाषा हिंदी होती तरीही ते पंढरीचे वारकरी होते. मराठी संतांच्या सहवासात वावरत असल्यामुळे त्यांना मराठीही चांगल्याप्रकारे येत होती. त्यांचे अनुयायी पंजाब, मध्यप्रदेश, राजस्थान या भागात आढळतात. तसेच त्यांची अनेक मंदिरे आणी मठ या भागात आहे. त्यांचा मूळ व्यवसाय नाभिकाचा होता.

वारकरी संप्रदायाने फ़क्त जातीपातीच्या सीमा मोडल्या नाहीत तर प्रांताप्रांताच्या सीमा ओलांडल्या. वेगवेगळ्या जातीतील अन प्रांतातील संतांनी वारकरी संप्रदाय स्विकारत भक्तिभाव जोपासत विठ्ठलाच्या नामस्मरणातुन जगाला उपदेश केला. आपल्या लिखाणातून समाजाला प्रबोधन करण्याचे कार्य असो किंवा भक्तीभावात वाहून नेण्याचे कार्य असो त्यांनी ते लिलया पेलले.

संत सेना महाराज त्यांच्या एका अभंगात असे म्हणतात,

आम्ही नाभिक नाभिक । करू हजामत बारीक ।।

विवेक दर्पण आयना दाऊ ।वैराग्य चिमटा हलवु ।।

उदकशांती डोईघोळू ।अहंकाराची शेंडी पिळू ।।

भावार्थाच्या बगला झाडू । कामक्रोध नखे काढू ।।

चौवर्णा देऊनी हात। सेना राहिला निवांत।।



सेना महाराज आपल्या व्यवसायाच्या रुपकामधुन अर्थपूर्ण तत्वज्ञान सांगतात. ते म्हणतात, आम्ही नाभिक अतिशय बारकाईने समजून उमजून हजामत करतो. हजामत करताना डोईला व चेहऱ्याला इजा होऊ नये आणी वेदना ही होऊ नये याची काळजी आम्ही घेतो.हजामतीनंतर आम्ही चेहरा पाहण्यासाठी विवेकरूपी आरसा दाखवतो. वैराग्यरुपी नाकातील व कानातील केस अलगद काढतो.

थंड पाणी डोईवर चोळून डोळ्याला व मनाला शांती लाभेल अशी चंपी आम्ही करतो. आणी डोईवरील केस उतरवल्यानंतर अहंकार आपोआप गळुन पडेल याची खातरजमा शेंडीला ओढ देऊन आम्ही करत असतो. दोन्ही हात वर करुन बगलेतील केस स्वच्छ करणे म्हणजे जीवनाचा भाव समजून घेणे होय. वाढणारी नखे ही मनुष्यातील प्राणीपणाचे व हिंस्रतेच्या लक्षणाचे निर्देशक असतात. ती आम्ही खूडून टाकतो म्हणजेच माणसा, तू मनुष्य आहेस, तू हे प्राणीपण सोडुन दे याची वारंवार जाणीव करुन देत असतो असे सेना महाराज या अभंगामध्ये म्हणतात. ब्राह्मण, क्षत्रिय, शुद्र आणी वैश्य अशा चार वर्णातील सर्वांनाच समतेने सेवा देऊन सर्वांशी आपलेपणाने , माणुसकीने वागून सेना निवांतपणे आपल्या जीवनाचे मार्गक्रमण करत आहे. सेना महाराजांनी यात किती साध्या, सोप्या, सरळ आणि मार्मिक शब्दांत आत्मिक विकासाचे मर्म सांगितले आहे.आपल्या व्यवसायाचा असणारा स्वाभिमान व त्याचे सामाजिक महत्त्व किती समर्थपणे विषद केले आहे.

संत सेना महाराजांची भक्ती किती असिम होती आणी त्यांच्या भक्तीपोटी साक्षात विठ्ठलाने त्यांना कशाप्रकारे दर्शन दिले या प्रसंगाचा उल्लेख ही खाली केला आहे. बादशाहाची हजामत करण्याचा मान सेना महाराजांना होता. असे म्हणतात की, एकदा बादशाहाने त्यांना हजामतीला बोलावले. तर सेना महाराज पूजेत रममाण झालेले होते. तेव्हा बादशहा चिडला आणि त्याने सेना महाराजांना पकडण्याचे आदेश दिले. तेव्हा प्रत्यक्ष विठ्ठलाने दरबारात जाऊन बादशाहाची हजामत केली आणि सेना महाराजांना वाचविले. देव आणि भक्त यातील नाते अधोरेखित करण्यासाठी मांडलेल्या या कथेतील भावार्थ आपण समजून घ्यायला हवा. सेना महाराजांनी आपल्या अभंगातूनही याच भक्तिरसाची उपासना केलेली आढळते. 'जाता पंढरीसी सूख वाटे जीवा' असे म्हणत हा वारकरी संत विठ्ठलचरणी लिन झाला आणी पंढरी ही त्यांच्या जीवनाचा ध्यास बनली तर श्रावण वद्य द्वादशी ही त्यांची पुण्यतिथी मानली जाते. अनेक संतांनी जसे आपल्याला माणुसधर्म जपण्याचा मार्ग दाखविला ,वारकरी संप्रदायाचे महत्त्व पटवुन दिले त्याचप्रमाणे संत सेना महाराजांनी देवभाव आणी आत्मिक विकासाची शिकवण समाजाला दिली आहे.

-शैलेश राऊत





*लोककिर्तनकार*

# संत गाडगे महाराज

आपली महाराष्ट्र भूमी ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. अनेक संत, महात्मे या महाराष्ट्राच्या मातीने घडवले. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत सावता याप्रमाणेच अगदी अलिकडच्या काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आणि केवळ वाणीतूनच नाही तर कृतीतून समाजाला शिकवण देणारे संत गाडगेबाबा हे महाराष्ट्रातच जन्मास आले.


संत गाडगेबाबांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 साली सेंडगावी झाला. त्यांचे लहानपणीचे नाव 'डेबू' होते. पूर्ण नाव 'डेबूजी झिंगरोजी जाणोरकर' होते. लहान असतांनाच वडील वारल्यामुळे ते त्यांच्या आईसोबत आपल्या मामाच्या गावी रहायला गेले. गाडगेबाबांचे लग्न झाले मात्र त्यांचे मन संसारात रमले नाही.

संत गाडगेबाबांनी स्वच्छतेचा संदेश दिला. त्यांनी हे फक्त लोकांना तोंडानेच सांगितले नाही तर, गाडगेबाबा स्वतः एखाद्या गावात जात, तेथूनच कुणाकडून खराटा घेत आणि गाव स्वच्छ करीत . रात्री त्याच गावातील लोकांना जमवून कीर्तन करीत असत. याचा अर्थ असाच की, गाडगेबाबा दिवसा झाडूने गावातील घाण साफ करीत आणि रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातील घाण साफ करीत असत.

संत गाडगेबाबांनी अंधश्रद्धेला कडाडून विरोध केला. 'देवाला नवस' या गोष्टीची बाबांना चीड येई. ते म्हणत कोंबड्या, बकऱ्याचा बळी देऊन देव पावत नसतो. जर देवाला नवस करून बाईला मुल होत असेल तर नवरा करायचा तरी कशाला? असा रोखठोक सवाल गाडगेबाबा उपस्थित करीत.

गाडगेबाबा विठ्ठलाच्या वारीलाही पंढरपूरला जायचे. मात्र विठ्ठलाचे दर्शन घेणे हा त्यांचा हेतू नसायचा. बाबा झाडूने लोकांनी घाण केलेला चंद्रभागेचा किनारा साफ करायचे. गाडगेबाबांची कीर्तन करण्याची वेगळीच शैली होती. बाबा लोकांनाही आपल्या कीर्तनात सामावून घ्यायचे, लोकांशी संवाद साधायचे. त्यासाठी ते वऱ्हाडी बोलीचा वापर करीत असत.

संत गाडगेबाबांना मंदिरातल्या देवापेक्षा मनातला देव महत्वाचा वाटे. गाडगेबाबा लोकांना 'जिता जागता देव दाखवायचे', म्हणजेच सत्कर्म करणारा माणूसच खरा देव आहे हे पटवून देताना ते कर्मवीर भाऊराव पाटील यांचे उदाहरण देत. बाबा म्हणत की," हे भाऊराव पाटील बघा मांगामहाराच्या पोराले शिकवते त्येला देव म्हणा, ते गांधीबाबा देशासाठी मर मर मरतय त्येला देव म्हणा. देव हा मनात असतो,मंदिरात फक्त पुजाऱ्याचे पोट असते."



गाडगेबाबांनी स्वच्छतेचा दिलेला संदेश खूपच महत्वाचा आहे. तो काल, आज आणि भविष्यातही उपयोगी आणि खूपच महत्वाचा आहे. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' या संकल्पनेला बाबा पुरेपूर न्याय देत. समाजातील वाईट प्रथा, माणसातील दुर्गुण यावर बाबांनी भाष्य केले.

संत गाडगेबाबा म्हणत, "जातीयता सोडा, व्यसनाधीनता सोडा, सावकारांकडून कर्ज काढू नका. अडाण्याला शिक्षण द्याव, भुकेल्याला अन्न द्याव, निराधाराला आधार द्यावा. हाच खरा धर्म बाबा मानत."

गाडगेबाबांच्या स्वच्छतेच्या संदेशावरूनच शासनाने 'संत गाडगेबाबा निर्मल ग्राम योजना' , 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले आहे. संत गाडगेबाबांचे कार्य हे न विसरता येणारे आहे. प्रबोधनकार ठाकरे यांनी गाडगेबाबा बद्दल म्हटले आहे की, "देवभोळ्या माणसांपासून ते शहरी नास्तिकांपर्यंत कुठल्याही वयोगटातल्या लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवायचे. आपलं तत्वज्ञान पटवून द्यायचे. त्यांच्या कीर्तनाचं शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरच काम आहे. अशा थोर संताचे निधन 20 डिसेंबर 1956 रोजी झाले.

- अजय त्रिभुवन





## ग्रामगिताकार

# संत तुकडोजी महाराज

महाराष्ट्राला वैचारिक चळवळीची मोठी परंपरा लाभली आहे आणि याच चळवळीत अत्यंत महत्वाची भूमिका निभावली ती संत चळवळीने. संत ज्ञानेश्वरांनी याचा पाया रचला. संत नामदेव, संत चोखामेळा,संत तुकाराम आणि अशा अनेक संतांनी या सगळयाला योग्य न्याय दिला. संत तुकडोजी महाराज ह्याच चळवळीतले आधुनिक काळातील महत्वाचे संत.

विदर्भातील एक महत्त्वाचे संत म्हणून तुकडोजी महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागाबद्दल अत्यंत पोटतिडकीने लिखाण केले आहे.त्यांनी राष्ट्रीय हितासाठी अनेक स्तरावर कार्य केले. ग्रामगीता,सार्थ आनंदामृत, सार्थ आत्मप्रभाव, गीताप्रसाद व बोधामृत अशा अनेक ग्रंथांचे लिखाण त्यांनी केले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागाच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यावर भाष्य करणाऱ्या ग्रामगीतेची निर्मिती केली.

तुकडोजी महाराजांनी विनोबा भावें सोबत भूदान चळवळीत सहभाग घेतला. 1955 मध्ये त्यांनी जपानमधील विश्व संमेलनात ही सहभाग घेतला होता. त्यांची वैचारिकता व क्रियाशीलतेने प्रभावित होऊन त्यावेळचे राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना "राष्ट्रसंत" या उपाधीने सन्मानित केले.

- गणेश गायके

# आमच्याबद्दल...

**'शिवस्फूर्ती वाचन कट्टा'**

हा औरंगाबाद शहरात स्थित तरुणांनी तरुणांसाठी चालवलेला उपक्रम आहे. 'एकमेका पुस्तके देवू । अवघे होवु बुद्धिवंत' या विचाराने सर्व वाचक, वैचारिक तरुण एकत्र येऊन विविध पुस्तके तसेच विविध ज्वलंत विषयांवर चर्चा होऊन हा कट्टा दर महिन्याला पार पडत असतो. अधिकाधिक तरुणांना वाचनाकडे आकर्षित करून 'आपल्या धडावर आपलेच डोके असावे' यासाठी तयार करणे हाच या वाचन कट्ट्यामागाचा उद्देश आहे. याअंतर्गत 'युवक' हे इ-षटमासिक आम्ही सुरु केलेले आहे.

आमच्याशी जोडुन घ्या...

**Website**

https://shivsphurtivachankatta.blogspot.com/

**Facebook Page**

https://www.facebook.com/adminVachanKatta/

**Instagram**

https://www.instagram.com/shivsphurti_vachan_katta/

**YouTube**

https://www.youtube.com/channel/UChVBI5XyE4UQL90fl6GoSzg

मित्रांनो आता आपणहि होउ शकता

# ‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’

चे सभासद !

खाली दिलेल्या लिंक वर जाउन फॉर्म भरावा.

आपल्याला **‘शिवस्फूर्ती वाचन कट्टा’** च्या समुहामधे समाविष्ट करुन घेतले जाईल.

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfncIGigYGjDQcZjQ96QEV71bgtKVrBQ5DNfqDWQ8xMa6MuQQ/viewform

**असाध्य ते साध्य करिती सायास कारण अभ्यास तुका म्हणे ॥**

हा महाराष्ट्र घडविणाऱ्या सर्व हातांच्या चरणी विनम्रतापुर्वक अर्पण !

**- युवक**

